Cambridge International Examinations
Cambridge International Advanced Level

**MARATHI** **9688/02**

Paper 2 Reading and Writing **October/November 2015**

**1 hour 45 minutes**

INSERT

*5198024461-I*

**READ THESE INSTRUCTIONS FIRST**

This Insert contains the reading passages for use with the Question Paper.

You may annotate this Insert and use the blank spaces for planning.
This Insert is **not** assessed by the Examiner.

**सर्वप्रथम खालील सूचना वाचा**

या पुस्तिकेतील उतारे वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.

या पुस्तिकेचा उपयोग टीपा लिहीण्यासाठी किंवा उत्तराच्या पूर्वतयारीसाठी होऊ शकतो.
ही पुस्तिका परीक्षक तपासणार नाहीत.

This document consists of **3** printed pages and **1** blank page.

DC (SLM) 104035/4
© UCLES 2015

CAMBRIDGE International Examinations

## विभाग 1

**पहिल्या** विभागातील **उतारा** वाचा आणि **प्रश्नक्रमांक 1**, **2** आणि **3** यांची उत्तरे लिहा.

### उतारा पहिला

लोकशाही तत्वाचा उगम अथेन्स देशात ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकात झाला. त्या समृद्ध काळच्या राजवटीत इच्छुकवर्गाला आपले मत देण्याचा अधिकार होता परंतु स्त्री वर्गाला आणि गुलामांना तो अधिकार कधीच नव्हता. इतिहासात लढयाशिवाय कोणताही देश लोकशाही-सत्ता प्राप्त करू शकला नाही. घराणेशाही, लष्करशाही किंवा कम्युनिस्ट-राजवट असो कोणीही सत्तेचा त्याग सुखासुखी करत नाही. असंतुष्ट जनतेला हक्कासाठी, न्यायासाठी वर्षानुवर्षे झगडावेच लागते. सार्वभौम राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण हे फक्त लोकशाहीमुळेच शक्य होते.

लोकशाहीमधे जनता गुप्त मतदान पद्धतीने लोकप्रतिनिधी निवडत असल्यामुळे मतदार कोणात्याही दबावाखाली नसतो. लोकप्रतिनिधी जनतेचे मत मांडतात. निवडणूक दर चार ते पाच वर्षांनी होते. निवडणूक जर स्पर्धात्मक असली तर विरोधी पक्ष एकमेकांवर अंकुश ठेवून असतात. बहुमताने निवडून आलेला पक्ष संविधानाशी निष्ठा ठेवण्याची शपथ घेऊन देशाचा राज्यकारभार सांभाळतो. आदर्श लोकशाही, समान मानवी हक्क आणि कायदेशीर सुरक्षिततेची हमी देते. पारदर्शी सरकार हा लोकशाहीचा पाया आहे. सरकारने घेतलेल्या निर्णयाची अचूक माहिती वेळोवेळी जनतेला सविस्तर कळविणे हे लोकप्रतिनिधींचे कर्तव्य आहे. आर्थिकदृष्ट्या, लोकशाहीला जनतेचा पाठींबा असल्यामुळे जनतेला हिशोबाचा जाब विचारण्याचा अधिकार असतो. प्रसार माध्यमे जनतेच्या अपेक्षांचा आणि सरकारी कामाचा सतत आढावा घेत असतात. सर्वांचे एकमेकांवर नियंत्रण असणे जरुरीचे असते. निवडून आलेले सरकार जर जनतेला मान्य नसेल तर ठराविक कालावधीनंतर बदलण्याचा अधिकार लोकांना असतो.

नागरिक न्यायासाठी लोकप्रतिनिधीकडे, न्यायालयाकडे वा सर्वोच्च न्यायालयातही जाऊ शकतो. लोकशाहीत सरकारला कायदे बनविण्याचा वा बदलण्याचा अधिकार असतो. कायदे अमलात आणण्याची जबादारी सरकारची असली तरी नि:पक्षपाती न्याय देण्याची जबाबदारी न्यायाधीशाची असते. पुढारलेल्या लोकशाही देशात अन्यायग्रस्तांना नुकसानभरपाई सुद्धा मिळते. समाज व्यवस्थेसाठी कर गोळा करणे, कायदा, सुरक्षा आणि सुव्यवस्था निर्माण करणे ही सरकारची जबाबदारी आहे. दंडाची, कैदेची किंवा मृत्यूची शिक्षा देण्याचा अधिकार केवळ सरकारलाच असतो, यावरून सरकारचे महत्व आपल्याला कळते. लोकशाहीत आर्थिक व सामाजिक समानतेला महत्व आहे. गगनचुम्बी इमारतीच्या शेजारी वसलेली झोपड-पट्टी, असे असमानतेचे चित्र अनेक प्रगतीपथावरच्या देशात पाहायला मिळते. कमी मिळकत असणाऱ्या नागरिकांना करमुक्तता, आरोग्यसेवा, प्राथमिक शिक्षण, निवास योजना यासारख्या अनेक खास सवलती सरकार आयोजित करत असते. आमच्या विभागातील प्रतिनिधी श्री. शाह, यांच्या मते, श्रीमंतांपेक्षा गरीब अधिक असल्यामुळे लोकशाहीत गरिबांनाच अधिक सामर्थ्य असते. जागतिक मानवी हक्कानुसार अल्प संख्यांकांना अस्मिता टिकविण्यासाठी खास सवलती देतात. अल्प संख्यांक धार्मिक, भाषिक व जातीय अशा कोणत्याही कारणामुळे असले तरी त्यांच्या संरक्षणाची हमी सरकार देते. अनेक देशात शारीरिक वा मानसिक व्यंग असणाऱ्या व्यक्तींना तसेच महिलांना खास सवलती देण्यात येतात.

सर्व प्रश्न यशस्वी लोकशाहीच्या चोख न्यायव्यवस्था, माध्यम स्वातंत्र्य आणि सरकारच्या कार्यक्षमतेमुळे त्वरित सुटतात. लोकशाही ही केवळ राज्यपद्धती नसून जीवन पद्धती असली पाहिजे. शाळेतच टप्याटप्याने लोकशाहीचे बाळकडू मुलांना दिले पहिजे. घरात, संस्थेत आणि समाजात घेतलेल्या निर्णयात प्रत्येकाने सहभागी झाले पाहिजे. अशा वातावरणात जनता कार्यतत्पर आणि कार्यक्षम होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने लोकशाही प्रगल्भ होऊन देशाच्या प्रगतीला मदत होईल.

© UCLES 2015

## विभाग 2

आता **दुसऱ्या** विभागातील **उतारा** वाचा आणि **प्रश्नक्रमांक 4** आणि **5** यांची उत्तरे लिहा.

**उतारा दुसरा**

लोकशाहीचे टीकाकार म्हणतात की सतत बदलत रहाणारे सरकार कोणतीही धोरणे योग्य रित्या अमलात आणू शकत नाही. 100% लोकशाही अशक्य आहे. लोकशाही यशस्वीरित्या टिकवण्यामध्ये बरेच अडथळे येतात.

मतदान पद्धती अतिशय खर्चिक असते. निवडणूक लढवणे केवळ श्रीमंतांनाच शक्य असून सामान्य माणसाच्या ते आवाक्याबाहेरचे आहे. मतदारांची नोंद करणे, त्यांच्या याद्या करणे हे एक अतिशय क्लिष्ट आणि वेळखाऊ काम आहे. बहुतेक देशात अंदाजे फक्त 50% मतदान होते. काही अपवाद वगळता, व्यक्ती-स्वातंत्र्याच्या पुरस्कारामुळे मतदान सक्तीचे नसल्यामुळे बुद्धीवादी वर्ग मतदान करतोच असे नाही. अनेकदा मतदार अपरिपक्व बुद्धीचे असल्यामुळे त्यांना राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती बद्दल जागरूकतेचा अभाव असतो. त्यांना स्वतःच्या हिताची आणि कर्तव्याची जाणीव नसते, अशी जनता मतदान करत नाही. मतदारांना पैसे देऊन, धाक दाखवून त्यांची मते बळकावण्याने अंदाधुन्दीचे राज्य निर्माण होते. याशिवाय मतपेट्या पळवणे, बोगस मतदान, मतदारांना खोटी आश्वासने देऊन भुलवणे हे नेहमीच ऐकण्यात येते. राजकीय सत्तेमुळे प्राप्त झालेल्या अधिकारांचा गैरफायदा घेऊन लोकप्रतिनिधी वाजवीपेक्षा जास्त प्रभावशाली बनतात. गुंडगिरी आणि भ्रष्टाचार करून अनेक गैर-मार्गाने जनतेला लुटतात तेव्हा लोकशाही हतबल होते. समानता आणि सुरक्षा या लोकशाहीच्या मूलभूत संकल्पना असल्या तरी प्रगत देशात सुद्धा स्त्रियांवर अत्याचार होत आहेत. बरेचदा कोणताही राजकीय पक्ष 50% मताने निवडून न आल्यामुळे युतीचे सरकार येऊन निरनिराळ्या तत्वांची रस्सीखेच होते.

लोकशाही सरकारला जरी कायदे बदलण्याचा हक्क असला तरी तो काळाप्रमाणे बदलण्यात कालावधी जातो, त्यामुळे अतोनात नुकसान होण्याची शक्यता असते. अनेकदा लोकांचे मत परिवर्तन होण्यासही वेळ लागतो. भारतामध्ये सध्या राखीव जागांचा प्रश्न अनेकांना भेडसावत आहे. दलित आणि मागास वर्गाच्या उद्धारासाठी अनेक सवलती सरकारने जाहीर केल्यामुळे शाळा-कॉलेजात दाखल होताना, सरकारी नोकरी मिळवताना त्यांनाच प्राधान्य असल्यामुळे बाकी जनतेत असंतोषाची लाट पसरलेली आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून 65 वर्षानंतर सुद्धा, आजच्या प्रचंड लोकसंख्येमुळे मूलभूत गरजा भागविणे अशक्य आहे. त्यामुळे बराचसे होतकरू तरुण आज भारताबाहेरच्या नोकरीला प्राधान्य देतात.

रशिया बलवान आणि अतिशय विस्तृत देश आहे. चीन देशात सर्वोच्च लोकसंख्या असून सुद्धा अल्पशा काळात, अनेक क्षेत्रात, जागतिक पातळीवर त्यांनी केलेली प्रगती वाखाणण्यासारखी आहे, पण या दोन्हीपैकी कुठेही लोकशाही तत्वे पूर्वीपासून नव्हती. लोकशाही ही काळाची गरज म्हटली तरी त्याचा गैरवापर देशाच्या प्रगतीमध्ये अडथळे आणतो. आमच्या शेजारी एक वृत्तपत्रकार राहतात. ते नेहमीच म्हणतात की लोकशाही विरुद्ध सर्वोत्तम वितर्क सामान्य माणसाशी केलेल्या पाच मिनिटांच्या संभाषणाने साधतो.

**BLANK PAGE**

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

To avoid the issue of disclosure of answer-related information to candidates, all copyright acknowledgements are reproduced online in the Cambridge International Examinations Copyright Acknowledgements Booklet. This is produced for each series of examinations and is freely available to download at www.cie.org.uk after the live examination series.

Cambridge International Examinations is part of the Cambridge Assessment Group. Cambridge Assessment is the brand name of University of Cambridge Local Examinations Syndicate (UCLES), which is itself a department of the University of Cambridge.